अमरावती महानगरपालिका, अमरावती

दिनांक ०१.१२.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

(प्रशासकीय विषय)

विषय क्रमांक ४८ : श्री. अक्षय निलंगे, वरिष्ठ लिपीक यांची सहा. निवडणुक अधिकारी (गट-ब) वेतनश्रेणी S१५, ४१८००-१३२३०० या वेतनश्रेणीचे नियुक्तीस मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी बाबत.

ठराव क्रमांक ४८ : अमरावती महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहा. निवडणुक अधिकारी (गट-ब) ०१ पद मंजुर असून, दिर्घ कालावधी पासून रिक्त आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ३ (२) नुसार, उक्त पदावर नेमणुक केली जाण्यास योग्य व्यक्ती आहे असे महानगरपालिकेचे मत असेल तर, महानगरपालिकेच्या नियमात विहित केलेली पध्दती न अनुसरता अशा कर्मचारी/ अधिकाऱ्याची उक्त पदावर नेमणुक करता येईल. असे महानगरपालिकेचे नियमामध्ये तरतुद आहे.

श्री. अक्षय निलंगे, वरिष्ठ लिपीक यांच्याकडे असलेली शैक्षणिक अर्हता व निवडणुक विभागातील कामकाजाचा अनुभव विचारात घेता, त्यांना सहा.निवडणुक अधिकारी (गट-ब) या पदावर नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. सदर पदाची सातवे वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी S-१५-४१८००-१३२३०० आहे. निवडणुक विषयक कामकाज सोयीचे होण्याचे दृष्टीने श्री. अक्षय निलंगे, वरिष्ठ लिपीक यांची सहा.निवडणुक अधिकारी (गट-ब) पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ३ (२) नुसार, नियुक्ती देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेचे तत्वतः मान्यता/मंजुरी करीता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा/**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा/**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती